**<u>ठळक बातम्या</u>**

1. वक्फ सुधारणा कायद्याला पूर्ण स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार/ तीन तरतुदींना दिली तात्पुरती स्थगिती
2. तिन्ही सेनादलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संयुक्त परिषदेचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
3. महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा शपथविधी
4. झारखंडच्या हजारीबाग जिल्ह्यात सुरक्षादलांच्या संयुक्त कारवाईत ३ नक्षली ठार

**आणि**

**5.** महाराष्ट्रात पुढचे ३ दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं वक्फ सुधारणा कायदा २०२५ ला पूर्णपणे स्थगिती द्यायला नकार दिला असला तरी या कायद्यामधल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए जी मसीह यांच्या खंडपीठानं हा निर्णय दिला. वक्फ करण्यासाठी देणगीदार किमान पाच वर्षे इस्लाम धर्माचा अनुयायी असावा ही तरतूद न्यायालयानं स्थगित केली आहे. वक्फ मालमत्तेचं सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण झालं की नाही हे ठरवण्याचा अधिकार शासनानं नेमलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना बहाल करण्यालाही खंडपीठानं स्थगिती दिली आहे. तसंच वक्फ बोर्डावर मुस्लिमेतर व्यक्तीची नेमणूक करण्याची तरतूद यासंदर्भात राज्य सरकारांनी ठोस नियम करेपर्यंत स्थगित राहील असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

आज दिलेला निवाडा प्रथमदर्शनी निरीक्षणांवर आधारित असून, खटल्याची सविस्तर सुनावणी नंतर होईल असंही न्यायालयानं सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कोलकाता इथं तीन दिवसीय संयुक्त कमांडर्स परिषदेचं उद्घाटन केलं. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. या परिषदेत सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह, संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान, तसंच लष्कर, हवाई दल आणि नौदल प्रमुख देखील सहभागी झाले. यावेळी लष्करी तसंच राजकीय धोरणांवर चर्चा होणार असून ‘सुधारणांचं वर्षः भविष्यासाठी परिवर्तन’ अशी या परिषदेची संकल्पना आहे. सशस्त्र दलांमध्ये सुधारणा, आधुनिकीकरण आणि सुसज्जता हे याचं उद्दिष्ट आहे.
तत्पूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं काल रात्री कोलकाता इथं आगमन झालं. आज सकाळी साडे नऊ वाजता ते विजय दुर्ग या परिषदेच्या ठिकाणी पोहोचले. दुपारी ते बिहारला रवाना होतील. पूर्णिया जिल्ह्यात ते ३६ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचा प्रारंभ करतील.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकतंच अनेक क्षेत्रातल्या वस्तू आणि सेवा करात सुधारणा केली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार असून अनेक व्यवसायाच्या वाढीसाठीही मदत होणार आहे. नव्या कररचनेनुसार बांधकाम साहित्यावरल्या जीएसटीतही सुधारणा झाली आहे. यामुळे बांधकाम व्यवसाय आणि ग्राहक या दोघांनाही फायदा होणार आहे. याबाबत अधिक जाणून घेऊया....

**व्हॉईस कास्ट- रश्मी पाटकर**

*नव्या कररचनेनुसार सिमेंटवरील जीएसटी दर २८ टक्क्यावरून १८ टक्के, वाळू-चुना- विटा यावरील जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के तसंच संगमरवर आणि ग्रॅनाईट ब्लॉक्सवरील जीएसटीही १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. यामुळे या वस्तू नागरिकांना परडवणाऱ्या दरात उपलब्ध होऊन यांची मागणी*

*वाढेल. याचा सकारात्मक परिणाम प्रधानमंत्री आवास योजनेसारख्या उपक्रमांवर पडणार असून अधिकाधिक नागरिकांचं घराचं स्वप्न पूर्ण व्हायला मदत मिळणार आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधांमधे वाढ होईल, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग बळकट होतील आणि रोजगार निर्मिती होईल.*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज अभियंता दिनाच्या निमित्तानं भारतरत्न एम. विश्वेश्वर यांना आदरांजली अर्पित केली आहे. विश्वेश्वर यांच्या कौशल्यानं भारताच्या अभियंता क्षेत्रावर अमिट ठसा उमटवला असल्याचं मोदींनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. शाह यांनी सर्व अभियंत्यांचं त्यांच्या सर्जनशीलता आणि नवोन्मेष यासाठी कौतुक केलं आहे.

**<><><><><>**

हिंदी भाषेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आजपासून देशभरात हिंदी पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत हिंदी भाषेत लेखन, वकृत्व, स्पर्धा व्याख्यानं असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

'राष्ट्रीय कृषी परिषद - रब्बी अभियान २०२५' नवी दिल्ली जवळ पूसा इथं आजपासून सुरु होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेचे अध्यक्ष केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान असतील. विविध राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे कृषी मंत्री, कृषी विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ, विज्ञान केंद्रांचे वरिष्ठ अधिकारी आणि देशभरातले कृषी तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, धोरण कर्ते आणि राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय समाज हा कायमच एक समावेशक समाज राहिल्याचं प्रतिपादन केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी केलं. मुंबई विद्यापीठाच्या

कलिना परिसरात इथे भाषा वारसा आणि सांस्कृतिक अभ्यास केंद्राचं भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते झालं, तेव्हा ते बोलत होते. ही फक्त एका अभ्यासक्रमाची सुरुवात नाही, तर भारताच्या सांस्कृतिक वारशात रुजलेल्या त्याच्या उज्ज्वल भविष्याच्या पायाचं मजबुतीकरण असल्याचं रिजिजू यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाशी संलग्न विविध संस्थांमधल्या शिक्षकांचा सत्कारही करण्यात आला. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाचे सचिव डॉ. चंद्रशेखर कुमार, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक रवींद्र कुलकर्णी आणि इतर उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज मुंबईच्या राजभवनात राज्यपाल पदाची शपथ घेतली. मुंबई उच्च नायायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर यांनी आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ दिली. आचार्य देवव्रत यांनी संस्कृत भाषेत शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर उपास्थित होते. माजी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची देशाच्या उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. आचार्य देवव्रत हे २०१९ पासून गुजरातचे राज्यपाल आहेत. त्याआधी त्यांनी हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

**<><><><><>**

झारखंडच्या हजारीबाग जिल्ह्यात सुरक्षादलांच्या संयुक्त कारवाईत ३ नक्षली ठार झाले. करांडी गावात हे नक्षली लपून बसल्याची खबर मिळाल्यवरुन झारखंड पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या कोब्रा बटालियनने ही कारवाई केली. ठार झालेल्यात सेंट्रल कमिटीचा सदस्य सहदेव सोरेन उर्फ परवेश याच्यावर १

कोटी रुपयांचं बक्षीस होतं. बिहार झारखंड स्पेशल एरिया कमिटीचा सदस्य रघुनाथ हेंब्रोम उर्फ चंचल याच्यावर २५ लाख रुपयांचं तर झोनल कमिटी मेंबर बिरसेन गंजू उर्फ रामखेलवान याच्यावर १० लाख रुपयांचं बक्षीस होतं. चकमकीच्या ठिकाणाहून एके ४७ रायफल सह शस्त्र आणि स्फोटकं पोलिसांनी जप्त केली आहेत.

दरम्यान पलामू जिल्ह्यातल्या मनातू जंगल परिसरात काल झालेल्या चकमकीत TSPC एरिया कमांडर मुखदेव यादव मारला गेला. बोकारोतला झुमरा आणि लुगु पहार परिसर तसंच गिरिदीहचा पारसनाथ परिसर आता पूर्णपणे नक्षलमुक्त झाला असल्याचा दावा झारखंडचे पोलीस महानिरीक्षक मायकेलराज एस यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना केला.

**<><><><><>**

दूरदर्शनच्या गौरवशाली प्रवासाची ६६ वर्षे आज पूर्ण होत आहेत. १५ सप्टेंबर १९५९ रोजी दूरदर्शनच्या माध्यमातून भारतीय प्रसारण युगाची सुरुवात झाली. आज, दूरदर्शन भारतातील सर्वात मोठी प्रसारण संस्था आहे, ज्यामध्ये स्टुडिओ आणि ट्रान्समीटरचे विस्तृत नेटवर्क आहे. देशभरातील सर्व शहरं आणि प्रादेशिक क्षेत्रं तसच आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत दूरदर्शन पोहोचलं असून आता मोबाइल अपच्या माध्यमातूनही दूरदर्शनचे कार्यक्रम पाहणं शक्य झालं आहे.

**<><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतील ग्रुप एच्या सामन्यात काल भारताने पाकिस्तान संघावर ७ गडी राखून विजय मिळवला. दुबईमध्ये झालेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तान संघानं १९ षटकं आणि ३ चेंडूत १२७ धावा केल्या. ही लक्ष्य पार करताना अभिषेक शर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताने २५ चेंडू शिल्लक असतानाच हा विजय मिळवला. हा विजय भारतीय सैन्यदलाला समर्पित करत असून पेहलगाम

हल्ल्यातील पीडितांच्या कुटुंबियांसोबत संघ उभा असल्याचं कर्णधार सुर्यकुमार यादव यानं सांगितलं.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे भारत ऑस्ट्रेलिया दरम्यान चंडीगढ इथं काल झालेला एकदिवसीय सामना भारताने गमावला. प्रथम फलंदाजी करुन भारताने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २८२ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. ५ षटकं आणि ५ चेंडू शिल्लक असताना ऑस्ट्रेलियानं ८ गडी राखून ते पार केलं.

**<><><><><>**

इंग्लंडमधील लिव्हरपूल इथं सुरू असलेल्या मुष्टीयुध्द अजिक्यपद स्पर्धेत जास्मिन लांबोरियाने पॅरिस ऑलिंपिक रौप्यपदक विजेती पोलंडची ज्युलिया जरेमेटाला हरवून फेदरवेट प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. दरम्यान, मीनाक्षी हुड्डाने काल ४८ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत कझाकस्तानच्या नाझिम कैझेबेला पराभूत करून सुवर्णपदक जिंकलं.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशात सतत सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला असून अनेक ठिकाणी भूस्खलन झालं आहे. पावसामुळे ३ राष्ट्रीय महामार्ग आणि ५९८ रस्ते बंद झाले आहेत तसच वीज, पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. आतापर्यंत ४०४ जणांचा मृत्यू तर ४६२ जण जखमी झाले असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागानं २१ सप्टेंबरपर्यंत राज्यात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाने जोर धरला आहे. काल मध्य रात्रीपासून राज्याच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस होत आहे. राजधानी मुंबईत जोरदार पावसामुळे अनेक सखल भागांत पाणी साचलं आहे. त्यामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतूक संथगतीनं होत आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्र आणि ईशान्ये कडच्या राज्यांना पुढील तीन दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, बिहार, पश्चिम बंगालचा काही भाग, सिक्कीम आणि उत्तराखंडमध्ये आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

**//<><><><><>//**